छायाःदीपक साळवी



# मेट्रो 3 : २ किमी भुयार खणण्यात एमएमआरसीला यश

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मार्गादरम्यान २ किमी लांबीचे भुयार खणण्यात एमएमआरसीला यश मिळाले आहे. केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत २ किमी भुयार खणण्याचे आव्हानच पेलण्यात आले.

मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र क्रांती घडवून आणण्याची क्षमता असलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या भुयारी मार्गाचे काम मुंबईसाठी अत्यंत आव्हानात्मक आहे. सध्या पॅकेज २ मध्ये आझाद मैदान शाफ्टमध्ये वैतरणा १ व २ या टनेल बोअरिंग मशिन्स कार्यरत असून एकूण ४.५ किमी अंतरापैकी ४५० मीटरचे खोदकाम पूर्ण करण्यात आले आहे. तर नया नगर या पॅकेज ४ मध्ये शाफ्टमध्ये कार्यरत असलेल्या कृष्णा १ आणि २ टीबीएम मशिन्सनी एकूण २.५ किमीपैकी १००० मीटर्स खोदकाम करण्यात आले आहे. विद्यानगरी येथील शाफ्टमध्ये पॅकेज ५ मध्ये २.९८ किमी पैकी ३४२ मीटर्स खोदकाम टीबीएमच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले आहे. विद्यानगरी येथे गोदावरी १ व २ या टीबीएम मशिन्स कार्यान्वित आहेत. तर पॅकेज ७ मधील मरोळ नाका येथे वैनगंगा १ आणि २ या टीबीएम मशीनने खोदकाम पूर्ण करण्यात आले आहे. एकूण १.२ किमी अंतरापैकी ३९५ मीटर्स खोदकाम करण्यात यश मिळाले आहे. ३३.५ किमी मार्गाच्या मेट्रो ३ मार्गिकेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मार्ग अवलंबण्यात येणार आहे. याबाबत एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी या प्रकल्पातील एक महत्त्वाचा टप्पा पार केला असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. सध्या १५ टीबीएम मशिन्सची चाचणी पूर्ण करण्यात आली आहे. संपूर्णतः १७ टीबीएम मशिन्स जुलै २०१८ पर्यंत कार्यरत होईल, अशी खात्रीही भिडे यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील वाहत्या नद्यांची नावे टीबीएम मशिन्सना देण्यात आली आहेत.